महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : आरएफआर-३६२३/प्र.क्र.४७४/२०२३/जाहिरात दिनांक : २४ जानेवारी, २०२४

## - शुध्दीपत्रक -

विषय :- **महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा- २०२४ (जाहिरात क्रमांक-४१४/२०२३)** - महाराष्ट्र वनसेवा परीक्षा-२०२४ मधील सहायक वन संरक्षक, गट-अ तसेच वनक्षेत्रपाल- गट-ब संवर्गाच्या जाहिरातीबाबत.

संदर्भ :- शासन पत्र, महसूल व वन विभाग, क्रमांक : एमएफएस-२०१८/प्र.क्र.९३/फ-८, दिनांक १९ जानेवारी, २०२४.

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांच्या मागणीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा- २०२४ (जाहिरात क्रमांक ४१४/२०२३) मधून भरावयाच्या विविध संवर्गाकरीता दिनांक २९ डिसेंबर, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२.** जाहिरात विज्ञापित झाल्यानंतर उपरोक्त संदर्भाधीन दिनांक १९ जानेवारी, २०२४ रोजीच्या शासन पत्राद्वारे प्राप्त सूचना पुढीलप्रमाणे आहेत :-

२.१ सहायक वनसंरक्षक, गट-अ व वनक्षेत्रपाल, गट-ब या संवर्गाकरीता कृषी व कृषीशास्त्र ही पदवी धारण करणा-या उमेदवारांना सदर दोन्ही संवर्गाकरीता अर्ज दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

२.२ कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभाग व मत्स्यव्यवसाय विभागाच्या दिनांक ७ सप्टेंबर, २०११ व दिनांक २२ एप्रिल, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील विशिष्ट शैक्षणिक अर्हता बी.एस.कृषी/बी.टेक. (कृषी अभियांत्रिकी) व तत्सम पदव्यांशी समतुल्य म्हणून घोषित केलेली शैक्षणिक अर्हता सहायक वन संरक्षक संवर्गाच्या दिनांक १२ मार्च, १९९८ व दिनांक १७ ऑगस्ट, २००९ व वनक्षेत्रपाल संवर्गाच्या दिनांक ५ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या सेवाप्रवेश नियमामध्ये समाविष्ठ केलेले नाही. त्यामुळे कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभाग व मत्स्यव्यवसाय विभागाने दिनांक ७ सप्टेंबर, २०११ व दिनांक २२ एप्रिल, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये विशिष्ट शैक्षणिक अर्हता बी.एस.कृषी/बी.टेक. (कृषी अभियांत्रिकी) व तत्सम पदव्यांशी समतुल्य म्हणून घोषित केलेली शैक्षणिक अर्हताधारक उमेदवारांना सहायक वनसंरक्षक, गट-अ व वनक्षेत्रपाल, गट-ब संवर्गाच्या पदभरतीसाठी ग्राह्य धरणे योग्य होणार नाही.

**३.** यानुसार उपरोक्त अभिप्रायाच्या अनुषंगाने वन सेवेतील सहायक वनसंरक्षक, गट-अ व वनक्षेत्रपाल, गट-ब संवर्गाकरीता कृषी व कृषीशास्त्र ही पदवी धारण करणा-या उमेदवारांचे अर्ज स्वीकारण्यात येत आहेत.

**४.** तसेच मूळ जाहिरातीस अनुसरुन यापूर्वीच अर्ज सादर केलेल्या कृषी अथवा कृषीशास्त्र अर्हताधारक उमेदवारांनी वन सेवेतील कोणत्याही एका संवर्गाकरीता विकल्प सादर केला असल्यास सदर उमेदवाराचा वन सेवेतील दुस-या संवर्गाकरीता देखील विकल्प ग्राह्य समजण्यात येईल. तसेच, प्रस्तुत सेवेच्या मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करताना पुन्हा विकल्प सादर करण्याची संधी देण्यात येईल.

**५.** जाहिरातीतील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग